गुन्हे शाखा ठाणे, घटक–४, उल्हासनगर          दिनांक :– २७/१२/२०१८

## घरफोडी चोरी करणाऱ्या महिलेचा पर्दाफाश करण्यास उल्हासनगर गुन्हे शाखेस यश

उल्हासनगर परिमंडळातील अंबरनाथ, बदलापुर, उल्हासनगर हद्दीत घरफोडी चोरीचे गुन्हयांचे प्रमाण वाढले होते. त्याअनुषगाने घडलेल्या घरफोडी चोरीच्या गुन्हयाचा समांतर तपास उल्हासनगर गुन्हे शाखा, युनिट ४ कडुन चालु असतांना पो.हवा. सुनिल जाधव यांना मिळालेल्या गोपनिय माहितीद्वारे दिनांक २१/१२/२०१८ रोजी विमको नाका, अंबरनाथ (प) या ठिकाणी सापळा लावला असता महिला नामे **शिरीन नुरअली शेख वय ३३ वर्षे रा. बुवापाडा, अंबरनाथ (प)** ही मिळुन आली. तीचेकडे तपास केला असता फिर्यादी यांचे कोहोजगाव, अंबरनाथ येथील यांचे रहाते घराचे दरवाजाची कडी लोखंडी कटावणीने तोडुन त्यांचे घरातील सोन्याचे व चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकुण १,५६,०००/–रू किमतीचा ऐवज घरफोडी चोरी केल्याची तीने कबुली दिली.

सदर आरोपी महिला ही बुरखा घालुन कपडे शिवण्याच्या बहाण्याने बिल्डींगमध्ये शिरून बिल्डींगमधील बंद असलेले घर हेरून कटावणीच्या सहाय्याने घरफोडी करत असे. ती महिला असल्याने तीचेवर कोणालाही संशय येत नसे व तीला कोणीही चेक करत नसे. सदर महिला दुपारी १२ ते ०३ वा.चे दरम्यान बंद घरामध्ये घरफोडी करत असे. तिचेकडे अधिक तपास केला असता तीने अंबरनाथ पश्चिमेकडील सदर घरफोडीसह आणखी २ ठिकाणी घरफोडी चोरी करून एकुण ११,४९,२१०/– रू. किमतीचे सोन्याचे व चांदीचे दागिने घरफोडी केले असल्याचे तपासात निष्पन्न झालेले असुन तीचेकडुन एकुण ३ घरफोडीचे गुन्हे केल्याचे उघडकीस आलेले आहेत. तीचेकडुन घरफोडी चोरीच्या गुन्हयातील सर्वच्या सर्व ११,४९,२१०/–रू. किमतीचे सोन्याचे ३८ तोळे व ५८ ग्रॅम ४२० मि.ग्रॅम चांदीचे दागिने, घडयाळे, बॅग अशा वस्तु हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. सदर आरोपीस मा. न्यायालयात हजर केले असता आरोपीची मा.न्यायालयाने दि. २६/१२/२०१८ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर, श्री. विवेक फणसळकर, मा. पोलीस सह आयुक्त श्री.मधुकर पांडेय, मा.अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे श्री. प्रविण पवार, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. दिपक देवराज, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री. बाजीराव भोसले, मा. सहा. पोलीस आयुक्त, श्री. एन.टी कदम शोध – ३ गुन्हे ठाणे,यांचे मार्गदर्शनाखाली उल्हासनगर गुन्हे शाखेचे वपोनि श्री. महेश तरडे, पोलीस निरीक्षक श्री. मनोहर पाटील, सपोनि श्री युवराज सालगुडे, सपोनिरी श्री श्रीकृष्ण नावले, पोउनि श्री गणेश तोरगल, सपोउपनिरी/सुरेंद्र पवार, पोहवा/१२८७ किशोर महाशब्दे, पोहवा/२०१४ प्रशांत तावडे, पोहवा/६०५३ भरत नवले, पोहवा/९७६ सुनिल जाधव, पोहवा/६००० रामचंद्र जाधव, पोहवा/३०७० गुरुनाथ जंगम, व मपोह/५२९९ मनिषा मोरे, पो.ना.५१५३ विकास कर्णे, पो.ना. २८४३ जगदीश कुलकर्णी, पो.ना.५४१६ नवनाथ वाघमारे, पोना/१५१२ जावेद मुलाणी, पोना/१३० विठ्ठल पदमेरे, पो.कॉ.७७०२ बाबुलाल जाधव, पोशि/७२२० योगेश पारधी व मपोशि/८६ माया तायडे यांनी केलेली आहे.

# प्रेस नोट

## महागडी दुचाकी वाहने चोरी करणा—या टोळीचा मालमत्ता गुन्हे शाखेकडून पर्दाफाश करण्यात यश

——— ००० ——

ठाणे आयुक्तालयात केटीएम डयुक, एफझेडएस, आर १५ यामाहा अशा महागडी दुचाकी वाहने चोरीस जाण्याचे प्रमाण वाढले होते. त्याअनुषंगाने आयुक्तालयात घडलेल्या अशाप्रकारच्या गन्हयांचा समांतर तपास चालू होता, त्यासाठी अशाप्रकारचे गुन्हे करणा—या वाहन चोरांच्या कार्यप्रणालीबाबत माहीती काढत असताना कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे धर्मेश चंदन रावत, वय २१ वर्षे, रा.ठि. टिटवाळा याला नमूद गुन्हयात प्रथमतः अटक करण्यात आली. त्याचेकडे कौशल्याने व तांत्रिक पध्दतीने अधिक चौकशी केली असता त्याने त्याचा साथीदार नामे योगेश विठ्ठल जाधव, वय २१ वर्षे, रा.ठि. टिटवाळा याचेबरोबर मिळून अशाप्रकारचे अनेक गुन्हे केले असल्याची माहिती प्राप्त दिली. तसेच त्यांनी चोरलेल्या मोटार सायकल त्यांचा साथीदार व मोटार सायकल मॅकॅनिक नामे रुषीकेश रवि चन्ने, वय १९ वर्षे, रा.ठि. टिटवाळा याचेमार्फतीने विकल्याची अधिक माहिती प्राप्त झाली. त्याप्रमाणे नमूद तिन्ही आरोपींना सदर गुन्हयात अटक करुन त्यांचेकडून ३ केटीएम डयुक, १ यामाहा एफझेडएस, १ आर १५ यामाहा, ६ बजाज पल्सर, १ अव्हेंजर, १ डिओ, ३ अॅक्टीवा अशी एकूण १६ दुचाकी वाहने, एकूण किं.रु. १२,१०,०००/— हस्तगत करण्यात आलेल्या असून ठाणे आयुक्तालय, नवी मुंबई आयुक्तालय, ठाणे ग्रामीण, रायगड, पालघर, अहमदनगर या जिल्हयातील एकूण १५ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. नमूद आरोपी हे आजूबाजूच्या परिसरामध्ये फिरुन प्रथमतः केटीएम डयुक, एफझेडएस, आर १५ यामाहा अशा महागडी दुचाकी वाहने जेथे पार्क केलेल्या आहेत, त्याठिकाणांची माहिती काढत होते व त्यानंतर सदरठिकाणी पुन्हा जावून अशा दुचाकी वाहनाचे हॅण्डल लॉक जोराने हिसका मारुन तोडून गाडी थोडी पुढे ढकलून नेवून इग्नीशनची वायर जोडून गाडी थेट चालू करुन चोरी करीत असल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास चालू असून अटक आरोपी दि. २९.१२.२०१८ पर्यंत पोलीस कोठडीत आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर, श्री विवेक फणसळकर, मा. सह पोलीस आयुक्त, श्री मधुकर पांडेय, मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री. प्रविण पवार, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री.दिपक देवराज, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, शोध २ श्री एन.टी. कदम गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे कक्षाचे वपोनि रविंद्र वाणी, सपोनि श्री प्रमोद सानप, सपोनि श्री मिलिंद पिंगळे, पोउनि/प्रदिप गायकवाड, सपोउपनि/सोपान पाटील, सपोउपनि/शामराव कदम, पोहवा/४९१५ बाळासाहेब भोसले, पोहवा/१०१९ गणेश पाटील, पोहवा/५२८१ नामदेव देशमुख, पोहवा/५५०० वसंत बेलदार, पोशि/७७९१ नरसिंग क्षिरसागर, पोशि/१९८४ अरविंद शेजवळ, मपोना/६७८७ अदिती तांबे, मपोशि/७५६८ सुनिता सानप, मपोशि/८११८ सुवर्णा जाधव यांनी केलेली आहे.

